**BY THE COMMISSIONER OF POLICE, GREATER BOMBAY**

**24th April 1974**

No. 4713/ Theatre Br. Of 1974 - The Following notification Which is issued under clauses (W) (Wa) (x) and (y) of Sub-section (1) Of Section 33 of the Bombay Police Act 1951 (Bom. XXII of 1951 ) is Published as required by sub- section (6) of section 33 Of the said act for the information of the public

## NOTIFICATION

No. 4713/ Theatre Br. Of 1974 - In exercise of the powers conferred by clauses (W) (Wa) (x) and (y) of Sub-section (1) Of Section 33 of the Bombay Police Act 1951 (Bom. XXII of 1951 ) the commissioner of police Greater Bombay, hereby, amends with the previous sanction of the Government of Maharashtra "The Rules for Licensing and Controlling place of Public Amusement (other than Cinemas ) and Performances for public Amusement including Melas and Tamashas 1960 Made by him and Published under Notification Nos. 2357/T of 1961 and 5594/ T of 1971 dated the 1st June 1961 and the 2nd July 1971 respectively in the Maharashtra Government Gazette, Part IV –C as Follows, Namely

1. These rules may be called the Rules for Licensing and Controlling Places of Public Amusement (other than Cinemas) and Performances for Public Amusement, including Melas and Tamashas (9th Amendment) Rules, 1974.
2. In the Rules for Licensing and Controlling Places of Public Amusement (Other than Cinemas) and Performances for Public Amusement, including melas and Tamashas 1960, for rules 137 to 145, the following shall be substituted, namely :-

   **137. Application for Certificate of Suitability – (**1) Any Person, who desires to hold or provide for any amusement performance, whether with

or without tickets, shall apply to the Chairman of the Board for the grant of a Certificate of Suitability therefor as provided in this Chapter,

(2.) Every such application shall be made in Form " I " It shall bear a Court fee stamp of Rupees two and be accompanied by the appropriate fee mentioned in rule 141 and by two typed or printed copies of the script submitted for scrutiny, any application which does not comply with these requirements and does not contain information about all the particulars mentioned in the said form to the satisfaction of the Board, shall be liable to be rejected by it.

(3) Any such application shall, except for exceptional reasons to be recorded in writing be disposed of by the Board within a period of six months from the receipt thereof.

**138. Grant Of Certificate of Suitability With or without conditions, :-** (1) On receipt of the application under rule 137 the Board may, after examining the script and obtaining such further particulars as it may deem fit, issue a Certificate of Suitability in respect of such performance, with or without any modifications, of the script, such certificates shall be issued in Form " J"

(2) Pending the grant of the Certificate of Suitability in respect of any script by the Board under this rule, the Chairman may, in his discretion after perusing the script himself or by such of the members of the Board whom he may determine and after ascertaining the views of such members, grant a provisional certificate of suitability in form "K" such Certificate shall be called a " Provisional Certificate of Suitability " and be valid until the date on which the decision of the Board to grant the Certificate of Suitability or to refuse to grant it, has been communicated to the applicant.

(3) If the Board on a scrutiny of the script submitted to it for scrutiny or otherwise, considers that any such performance is open to any of the objections specified in rule 139 and that the script would be rendered suitable for public amusement only after certain modifications or deletions are made therein, the Board shall inform the applicant accordingly, stating the modifications or deletions which in its opinion are necessary and the reasons therefore and give the applicant a reasonable opportunity of making the modifications, or of representing his case against proposed modification. if, after hearing the applicant, the Board is satisfied that no modification, or deletion in the script as directed by it is necessary, the Board shall issue the Certificate of Suitability in respect, of the performance. Where, however, the Board is not satisfied by the reasons, given by the applicant and considers that certain deletions or modifications, in the script are necessary, the Board shall issue a Certificate of Suitability specifying therein the conditions subject to which it is issued;

Provided that, where in respect of any script the Board considers that the performance thereof is fit to be witnessed by adults only it shall specify in the certificate of Suitability a condition restricting admission to such performance to adults only.

(4) Before refusing to issue a Certificate of Suitability in respect of any performance or issuing it subject to certain conditions, the Board shall

give the applicant a reasonable opportunity of representing his case, and when the certificate is refused or granted subject to certain conditions, it shall communicate to the applicant the reasons for refusal or grant of permission subject to conditions,

(5) Any person applying for a certificate of suitability who is aggrieved by any order of the board refusing to grant the certificate, or granting certificate restricted to adults only or directing the applicant to make any modifications or deletions may within thirty days from the date on which such Order is communicated to him, appeal to the State Government and the Order of the state Government on such appeal shall be final, Such appeal shall bear a court fee stamp of rupees two.

**139. General principles to be followed by Board in the grant or refusal of a Certificate of Suitability :-** (1) The Board shall not grant a Certificate of Suitability in respect of any performance, if on a scrutiny of the script submitted to it for scrutiny or otherwise, it considers –

(A) that the performance or any part thereof would be against -

(i) the interest of the sovereignty and integrity of India or the security of the State,

(ii) friendly relations with foreign States,

(iii) Public order, decency or morality,or

(iv) involves contempt of Court:

(B) that the performance or any part thereof will lower the moral standard of those persons who are likely to see it, that is to say, where the sympathy of the audience is likely to be thrown on the side of crime, wrong-doing evil or sin and, in particular, deals with crime in such a manner as to –

(i) extenuate criminal acts;

(ii) depict the modus operandi of criminals ;

(iii) throw the glamour of romance and heroism over criminal characters ;

(iv) enlist the sympathy or admiration of the audience for criminal characters ;

(v) hold up to contempt those responsible for, or engaged in any work relating to prevention, detention or punishment of criminals ;

(vi) create the impression that crime pays or is a normal incident of ordinary life and not to be reprobated ;

(C) that in the script thereof the standards of life, having regard to the standards of the state orany part thereof and the people to which the story relates, are so portrayed as to deprive the morality of the audience and in particular –

(a) deals with vice or immorality in such a manner as to –

(i) extenuate vicious or immoral acts ;

(ii) undermine the accepted canons of decency ;

(iii) depict vice or immorality as attractive ;

(iv) cast a halo of success or glory round the vicious or immoral;

(v) enlist the sympathy or admiration of the audience for vicious or immoral characters;

(vi) suggest that the attainment of a laudable and is justified by vicious or immoral means or improper motives;

(vii) create the impression that vice and immorality are not to be reprobated; or

(b) deals with the relations between the sexes in such a manner as to –

(i) lower the sacredness of the institution of marriage;

(ii) suggest that illicit sexual relations are ordinary incidents of life and not to be reprobated;

(D) that in the performance, any law in force, is being so ridiculed as to create sympathy for violation thereof ;

(E) that the performance would bring into contempt the armed forces of the Union or the public services or persons entrusted with the administration of law and order;

(F) that the performance is intended or likely to –

(a) wound the susceptibilities of any foreign nation or any community or the followers of any religion;

(b) foment social unrest or discontent to such an extent as to incite people to crime;

(c) promote disorder, violence, a breach of the law or dis-affection or resistance to Government;

(G) that the performance attempts to defame or contains offensive references to –

(a) any high personality ; or

(b) any person of repute in the literary, social and cultural or political field;

(H) that the performance is grossly indecent,scurrilous or obscene or is intended for blackmail.

(2) The Board shall not delete a part or parts of the performance or refuse a certificate of suitability to the whole of it merely on the ground that the provisions of this rule are attracted and if the retention of certain words, dialogues, or scenes in the performance is necessary and vital for preservation and promotion of the artistic value thereof, the Board shall certify such performance as suitable, notwithstanding that it attracts the provisions of this rule.

**140.** Preparation of approved list of Scripts for Amusement Performances - As soon as may be, after the 1st April, 1974 the Board shall prepare and maintain thereafter an up-to date list to be called “ the approved list of scripts of amusement performances “ containing the name of every script in respect of which it has issued a Certificate of Suitability without any modification. a copy of every such list shall be forwarded by the Board to the licensing authority or authorities concerned.

**141.** Fees :- The fees in respect of scrutiny of scripts referred to in sub-rule (2) of rule 137 Shall be as follows :-

| | |
|---|---|
| (1) Script of a drama | ..... Rupees thirty |
| (2) Script of a lok- natya | ...... Rupees fifteen |
| (3) Script of a Variety entertainment programme (including songs, dances and such other performances ) | ...... Rupees ten |
| (4) Script of one - act play | ...... Rupees ten |
| (5) Script of a **tamasha** such as wag or lavani | ...... Rupees five |
| (6) Script of a ganesh mahotsava Mela, | ...... Rupees three |

**142. Access to chairman and Members etc :-** The Chairman and Members of the Board shall be given free access at all reasonable times to any place where any amusement performance is to be, or is being performed or exhibited and two seats in the highest class of accommodation at such performance shall be reserved for them by the organiser of the performance. The Honorary Readers appointed by the chairman of the Board of Scrutiny of Scripts shall also have such free access and be given such accommodation.

**143. Suspension or cancellation of Certificate of Suitability :-**

(1) If the Chairman or any member of the Board after witnessing any performance considers that the whole or any part of the performance actually performed or exhibited was not scrutinised and certified by the Board or that there has been a breach of any condition subject to which a Certificate of Suitability was granted in respect of such performance may make a report of the fact to the Board and send a copy there of to the licensing authority.

(2) On receipt of the report under sub-rule(1), the Board may suspend or cancel the Certificate of Suitability, if any, in respect of the performance and shall communicate about such suspension or cancellation to the licensing authority, as early as possible.

(3) If at any time, it appears to the licensing authority that during any performance the script included in the approved list of suitable scripts prepared by the Board under rule 140 is departed from substantially so as to become objectionable in any manner, the licensing authority may, after hearing the party concerned, suspend or cancel the performance licence.

**144. Re – examination of scripts, etc. :-** Notwithstanding anything contained in these rules, the Board may at any time of its own motion or on representation made to it in that behalf, re-examine the script of any performance in respect of which a Certificate of Suitability has already been granted by it under rule 138 and if the Board is of the opinion that the script is unfit for performance for public amusement on any of the grounds referred, to in rule 139, the Board may, after giving the person affected thereby a reasonable opportunity of being heard, suspend or cancel the Certificate, of Suitability granted by it. The Board shall communicate its decision to the licensing authority.

**145. Duplicate copy of Certificate of Suitability :-** If any Certificate of Suitability granted in respect of any performance under rule 138 is lost or destroyed, the Board may on an application of the person concerned and on payment of a fee of Rupees Three, grant a duplicate copy thereof, clearly stamped “DUPLICATE” in red ink.

**145- A Exemption :-** Nothing in these rules shall apply –

(a) to amusement performances (except tamashas and lavanis) the scripts of which were published before 1900 A.D, provided that after such publication no additions or alterations have been made to such scripts ;

(b) to any amusement performance (except melas the script of which were not scrutinised and passed by the Board at any time heretofore ) which has been licensed under any licensing rules in force in Greater Bombay provided that the Board may, at any time of its own motion or on a representation made to it in that behalf, examine that script of any such performance and if the Board is of the opinion that the script is not suitable for performance on any of the ground referred to in rule 139, the Board may after giving a reasonable opportunity to the person affected thereby, declare that the exemption from the provisions of these rules in respect of such performance is withdrawn and communicate its decision to the licensing authority.

M. G. MUGVE,
Commissioner of Police, Greater Bombay

Dated the 23rd April. 1974

FORM – “ K ”

( See Rule 138 (2) of the Rules for licensing and Controlling Places of Public Amusement , etc)

**Form of Provisional Certificate Of Suitability**

Provisional Certificate No -

Date -

Name Of the applicant and his/
her address -

Name of the party represented
by the applicant -

Date of application -

Title of the script -

Name Of the Author -

Certified that the script of the above-mentioned amusement performance has been scrutinised by the Chairman and/or member/ members or readers selected by him as per rule 138 (2) and this Certificate has been issued Subject to the power of the Board to sanction the performance with the

following conditions. It shall be valid till the Board takes its final decision.

Conditions :-

Chairman
State Performances Scrutiny Board,
Government Of Maharashtra, Bombay

Under the amended Rule 142 two seats have to be kept reserved in the highest class for the Chairman and Members of the Honorary Readers appointed by the Chairman Of the Board, at each performance.

FORM " I "

( See Rule 137 (2) of the Rules for licensing and Controlling Places of Public Amusement , etc)

**Form of Application for Certificate of Suitability of Amusements Performance,**

Full name of the applicant -
His/her age -
His/her address -

Name and address of the party on behalf. of which the application is made. -

Nature of the performance (whether Drama, Tamasha, Mala etc. ) -

Title of the script submitted for scrutiny. -
Name of the author -
Name and address of the publisher -

Year of publication -
Number of edition submitted for Scrutiny. -
Number of copies submitted -

Date : Signature of the applicant

1) If an applicant cannot sign the application form he can send it with his thumb impression taken in the presence of a Police patil or a Mamlatdar and attested by him.
2) Any person who desires to hold or provide any amusement performance, whether with or without tickets, shall apply to the Chairman of the board for grant of a Certificate of Suitability therefore.
3) Every such application shall be made in Form 'I'. It Shall bear a Court Fee stamp of rupees two and accompanied with appropriate fee mentioned in Rule 141 and by two typed or printed Copies of the script submitted for Scrutiny, Any application which does not Comply with these requirements and which does not contain information about all the particulars mentioned in the said form to the satisefaction of the board shall be liable to be rejected by it .

FORM – " J "

(See Rule 138 (1) Of the Rules for Licensing and Controlling Places of Public Amusement etc)

Certificate of Suitability issued by the Stage Performances Scrutiny Board

No. Of the Certificate -

Date Of Issue -

Name Of the applicant -

Name of the party represented by the applicant. -

Address of the applicant -

Date of application -

Title of the Script and the name of the author. –

Name of the publisher -

Year of publication and number of the edition -

Certified that the Script of the above mentioned amusement performances is suitable for performance or exhibition for public amusement in the state of Maharashtra provided that the following conditions shall be complied with –

Conditions

Chairman
Stage Performances Scrutiny Board,
Government of Maharashtra, Bombay

Rule Made by State Government.

The Chairman and Members of the Stage Performances Scrutiny Board shall be given free access to any place where any amusement performance is to be or is being performed or exhibited and two seats in the highest class of accommodation shall be reserved for them by the organiser of such performance.

## बृहन्मुंबई पोलीस आयुक्तांनी काढलेली अधिसूचना

**२४ एप्रिल १९७४**

क्रमांक ४७१३ /थिएटर ब्रँच/१९७४ - मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई बावीस) याचे कलम ३३, पोट कलम (1) चे खंड (डब्ल्यु), (डब्ल्युअ),(एक्स) आणि (वाय) या अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना, उक्त कलम ३३, पोट कलम (६) व्दारे आवश्यक असल्याप्रमाणे नागरीकांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

### अधिसूचना

क्रमांक ४७१३ /थिएटर ब्रँच/१९७४ - मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई, बावीस) याचे कलम ३३, पोट कलम (1) चे खंड (डब्ल्यु), (डब्ल्युअ),(एक्स) आणि (वाय) या व्दारे प्राप्त अधिकारानुसार मुंबईचे पोलीस आयुक्त याव्दारे, त्यांनी पूर्वीमान्यता दिलेल्या, अधिसुचना क्र. २३५७/T- १९६१ आणि क्रमांक ५५९४/ T — १९७१ अनुक्रमे दिंनाक ०१ जून १९६१ व दिंनाक ०२ जुलै १९७१ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या " सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशे धरुन सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग यांना अनुज्ञप्ती देणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे नियम, १९६० " मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करीत आहेत.

१. या नियमांस, सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशे धरुन, सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग यांना अनुज्ञप्ती देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे (९ वी सुधारणा) नियम, १९७४ असे म्हणता येईल.

२. सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा (सिनेमाव्यतिरिक्त) आणि मेळे व तमाशे धरुन सार्वजनिक मनोरंजनाचे प्रयोग यांना अनुज्ञप्ती देणे व त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे नियम, १९६० यामधील नियम १३७ ते १४५ ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :-

**१३७. योग्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज** — (१) कोणताही मनोरंजनाचा प्रयोग मग तो तिकिटासह किंवा विनातिकीट असो—करण्याची किंवा त्यासाठी तरतूद करण्याची जिची इच्छा आहे अशी कोणतीही व्यक्ती, या प्रकरणात तरतूद केल्याप्रमाणे, त्यासंबधी योग्यता प्रमाणपत्र मिळण्यासाठी मंडळाच्या अध्यक्षाकडे अर्ज करील.

(२) असा प्रत्येक अर्ज, नमुना "आय" मध्ये करण्यात येईल. अशा प्रत्येक अर्जावर दोन रुपयांचा न्यायालय शुल्क मुद्रांक असेल आणि त्याबरोबर नियम १४१ मध्ये नमूद केलेली समुचित फी तसेच परिनिरीक्षणासाठी सादर केलेल्या लिखाणाच्या दोन टंकलिखित किंवा मुद्रित प्रती असतील. ज्या अर्जाच्या बाबतीत मंडळाचे समाधान होईल अशा रीतीने आवश्यक गोष्टींचे पालन झालेले असेल आणि उक्त नमुन्यात नमूद केलेल्या सर्व तपशिलाची माहिती त्यात अंतर्भूत केलेली नसेल तर असा कोणताही अर्ज मंडळाकडून नाकारला जाण्यास पात्र ठरेल.

(३) असा कोणताही अर्ज, लेखी नमूद करावयाच्या अपवादात्मक कारणाव्यतिरिक्त तो मिळाल्याच्या तारखेपासून सहा महिने मूदतीच्या आत, मंडळाकडून निकालात काढण्यात येईल.

. . . . . २

**१३८. योग्यता प्रमाणपत्र सशर्त किंवा बिनशर्त देणे** — (१) नियम १३७ अन्वये अर्ज मिळाल्यावर, मंडळास, लिखाणाचे परीक्षण केल्यानंतर आणि त्यास योग्य वाटेल असा आणखी तपशील मिळाल्यानंतर लिखाणात कोणताही फेरफार करुन किंवा फेरफार न करता, अशा प्रयोगासंबंधात योग्यता प्रमाणपत्र देता येईल. असे प्रमाणपत्र नमुमा "जे" मध्ये देण्यात येईल.

(२) कोणत्याही संहितेसंबंधात, या नियमान्वये मंडळाकडून योग्यता प्रमाणपत्र देण्यात येईतोपर्यन्त, अध्यक्षास, स्वत:च लिखाणाचे अवलोकन करुन किंवा अध्यक्ष ठरवील अशा मंडळाच्या सदस्यांकडून लिखाणाचे अवलोकन करवून घेऊन आणि अशा सदस्यांच्या मताबद्दल खात्री करुन घेतल्यानंतर, नमूना "के" मध्ये तात्पुरते योग्यता प्रमाणपत्र देता येईल. अशा प्रमाणपत्रास "तात्पुरते योग्यता प्रमाणपत्र" असे संबोधण्यात येईल आणि योग्यता प्रमाणपत्र देण्यासंबंधीचा किंवा ते न देण्यासंबंधीचा निर्णय ज्या तारखेस अर्जदारास कळविण्यात येईल त्या तारखेपर्यन्त ते विधिग्राहय राहील.

(३) मंडळाकडे परिनिरीक्षणासाठी किंवा अन्यथा सादर केलेल्या लिखाणाचे परिनिरीक्षण केल्यानंतर अशा कोणत्याही प्रयोगाच्या बाबतीत नियम १३९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आक्षेपांपैकी कोणताही आक्षेप येणे शक्य आहे आणि लिखाणात विवक्षित फेरफार करुन किंवा त्यातील काही भाग वगळून लिखाण हे सार्वजनिक मनोरंजनासाठी योग्य होईल असे,वाटले तर मंडळ त्याच्या मते आवश्यक असतील असे फेरफार किंवा वगळावयाचा भाग आणि त्याची कारणे नमूद करुन, त्यानुसार अर्जदारास कळवील आणि फेरफार करण्याची किंवा प्रस्ताविक फेरफार का करण्यात येऊ नयेत याबद्दल आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी मंडळ अर्जदारास देईल. अर्जदाराची बाजू ऐकून घेतल्यानंतर लिखाणात आपण निदेश दिल्याप्रमाणे कोणताही फेरफार करण्याची किंवा त्यामधील कोणताही भाग वगळण्याची आवश्यकता नाही, याबद्दल मंडळाची खात्री होईल तर, मंडळ त्या प्रयोगाच्या बाबतीत, योग्यता प्रमाणपत्र देईल. तथापि, अर्जदाराने दिलेल्या कारणांनी मंडळाचे समाधान झाले नसेल आणि लिखाणातील विवक्षित भाग वगळणे किंवा त्यात फेरफार करणे आवश्यक आहे असे मंडळास वाटेल त्याबाबतीत, ज्या शर्तीस अधीन राहून असे प्रमाणपत्र देण्यात येईल त्या शर्ती, विनिर्दिष्ट करुन मंडळ असे योग्यता प्रमाणपत्र देईल.

(४) कोणत्याही प्रयोगाच्या संबंधात योग्यता प्रमाणपत्र देण्यास नकार देण्यापूर्वी किंवा विवक्षित "शर्ती"स अधीन ठेवून ते देताना, मंडळ, अर्जदारास आपल्या प्रकरणाचे निवेदन करण्याची वाजवी संधी देईल आणि प्रमाणपत्र नाकारण्यात येईल किंवा विवक्षित शर्तीस अधीन ठेवून ते देण्यात येईल तेव्हा, मंडळ अशा नकाराची कारणे किंवा शर्तीस अधीन ठेवून परवानगी देण्याची कारणे अर्जदारास कळवील.

(५) योग्यता प्रमाणपत्रासाठी अर्ज करणा-या ज्या व्यक्तीस, प्रमाणपत्र देण्यास नकार देण्या-या किंवा (प्रयोग) केवळ प्रौढांपुरताच मर्यादित असेल या शर्तीस अधीन ठेवून प्रमाणपत्र मंजूर करणा-या किंवा कोणतेही फेरबद्दल किंवा भाग वगळण्याबद्दल अर्जदारास निदेश देणा-या, मंडळाच्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या तारखेस तिला असा आदेश कळवण्यात आला असेल त्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, राज्य शासनाकडे अपील करता येईल आणि अशा अपिलावरील राज्य शासनाचा आदेश अंतिम असेल. अशा अपिलावर दोन रुपयांचा न्यायालय शुल्क मुद्रांक असेल.

**१३९. <u>योग्यता प्रमाणपत्र देताना किंवा नाकारताना मंडळाने अनुसरायची सर्वसाधारण तत्वे</u>**

(१) परिनिरीक्षणासाठी किंवा अन्यथा मंडळाकडे सादर करण्यात आलेल्या संहितेचे परिनिरीक्षण केल्यावर, मंडळास असे वाटेल की ---

(अ) तो प्रयोग किंवा त्याचा कोणताही भाग —

(एक) भारताचे सार्वभौमत्व आणि एकात्मता यास किंवा राज्याच्या सुरक्षिततेस,

(दोन) परकीय राज्याबरोबर असलेल्या मित्रत्वाच्या संबंधास,

(तीन) सार्वजनिक सुव्यवस्था, सभ्यता किंवा नीतिमत्ता यास बाधक आहे

किंवा

(चार) त्यामुळे न्यायालयाचा अवमान होत आहे.

(ब) तो प्रयोग किंवा त्याचा कोणताही भाग, ज्या व्यक्ती तो प्रयोग पाहण्याचा संभव असेल त्या व्यक्तींची नैतिक पातळी खालावेल म्हणजेच गुन्हा, अपकृत्य, दुष्टपणा किंवा पाप या गोष्टीस प्रेक्षंकाची सहानुभूती मिळण्याचा संभव असेल आणि विशेषत: त्यामध्ये गुन्हा अशा रीतीने हाताळण्यात आला असेल की त्यामुळे :-

(एक ) गुन्हयाचे गांभीर्य कमी होत असेल,
(दोन) गुन्हेगारांची कार्यप्रणाली उघड होत असेल.
(तीन) गुन्हेगार पात्रांवर अदभूततेचे आणि पराक्रमाचे वलय चढत असेल,
(चार) गुन्हेगार पात्रास प्रेक्षकांची सहानुभूती किंवा प्रशंसा लाभत असेल,
(पाच) गुन्हेगारास प्रतिबंध करण्यास, अटकाव करण्यास किंवा शिक्षा करण्यात जबाबदार असलेल्या व्यक्तीप्रत किंवा ते काम करण्या-या प्रत तिरस्कार दर्शविला जात असेल.
(सहा) गुन्हा केल्याने फायदा होतो किंवा सामान्य जीवनातील ती एक नेहमीची घटना असून तीबद्दल नापसंती दाखवू नये अशी भावना निर्माण होत असेल.

(क) कथानक ज्या राज्यासंबंधी किंवा राज्याच्या भागासंबंधी असेल त्या राज्याचा व लोकांचा दर्जा लक्षात घेऊन प्रेक्षकांची नीतिमत्ता बिघडेल अशा रीतीने जीवनमान लिखाणात रेखाटण्यात आले असेल आणि विशेष करुन, --

(अ) दुर्गुण किंवा अनैतिकता अशा रीतीने दाखविण्यात आली असेल की त्यामुळे—
(एक) दुष्कृत्यांचे किंवा अनैतिक कृत्यांचे गांभीर्य कमी होत असेल,
(दोन) सभ्यतेच्या मान्य सिध्दांतास धोका निर्माण होत असेल,
(तीन) दुर्गुण किंवा अनैतिकता ही आकर्षक वाटणारी गोष्ट आहे असे दाखविले जात असेल,
(चार) दुर्गणी किंवा अनैतिक व्यक्तीभोवती यशाचे किंवा उदात्ततेचे वलय निर्माण होत असेल,
(पाच) दुष्ट किंवा अनैतिक कृत्ये करणा-या पात्रास प्रेक्षकांची सहानुभूती मिळत असेल किंवा ती प्रेक्षंकाकडून प्रशंसिली जात असतील,
(सहा) एखादे स्तुत्य उद्दिष्ट दुष्ट किंवा अनैतिक मार्गाने किंवा अयोग्य हेतूने साध्य करणे हे समर्थनीय ठरते असे सूचित होत असेल,
(सात) दुर्गुण व अनैतिकता याबद्दल नापसंती दाखवू नये अशी भावना निर्माण होत असेल.

(ब) स्त्री-पुरुषांमधील संबंध अशा रीतीने दाखविण्यात आले असतील की त्यामुळे—
(एक) विवाहसंस्थेचे पावित्र्य कमी होत असेल,
(दोन) अनैतिक स्त्री-पुरुष संबंध या जीवनातील सामान्य घटना असून त्याबद्दल नापसंती दाखवू नये, असे सूचित होत असेल,

(क) त्या प्रयोगात, अंमलात असलेल्या कायद्याचा भंग करण्याची प्रवृत्ती निर्माण होईल अशा रीतीने त्या कायद्याचे विडंबन करण्यात आले असेल,

(इ) त्या प्रयोगामुळे संघराज्याच्या सशस्त्र फौजेतील किंवा सरकारी नोकरीतील किंवा कायदा सुव्यवस्था प्रत्यापित करण्याचे काम सोपविण्यात आलेले असे इसम यांचा

अपमान होत असेल

(फ) (अ) कोणत्याही परराष्ट्राची किंवा कोणत्याही समाजाची किंवा कोणत्याही धर्माच्या अनुयायांची भावना दुखवण्याचा उद्देश किंवा संभव असेल,

(ब) लोकांना गुन्हा कराण्यास उत्तेजन मिळेल इतक्या मर्यादेपर्यन्त समाजात अस्वस्थता किंवा असंतोष निर्माण करण्याचा उद्देश किंवा संभव असेल,

(क) अव्यवस्था, हिंसा, कायद्याचा भंग किंवा शासनाप्रत अप्रीती किंवा विरोध या गोष्टी वृध्दिंगत करण्याचा उद्देश किंवा संभव असेल,

(ग) त्या प्रयोगामुळे---

(अ) कोणत्याही श्रेष्ठ व्यक्तीची किंवा साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक किंवा राजकीय क्षेत्रातील सुप्रसिध्द अशा कोणत्याही व्यक्तीची मानहानी करण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल किंवा उपरोक्त व्यक्तीसंबंधी त्यामध्ये प्रक्षोभक निर्देश असेल,

(ह) तो प्रयोग एकंदरीत असभ्य, शिवराळ किंवा अश्लील असेल किंवा धमकीने पैसे उकळण्याचा त्याचा उद्देश असेल तर, मंडळ, अशा कोणत्याही प्रयोगाच्या संबंधात, योग्यता प्रमाणपत्र देणार नाही.

(२) या नियमाच्या उपबंधांचे उल्लंघन होत आहे आणि त्या प्रयोगातील कलात्मक मूल्यांचे जतन करण्यासाठी व त्यास प्रोत्साहन देण्यासाठी यामधील विवक्षित शब्द, संवाद किंवा अंक (आहे तसाच) लेखणे, आवश्यक व अत्यंत महत्वाचे आहे याच केवळ कारणावरुन, मंडळ त्या प्रयोगातील भाग वगळणार नाही किंवा त्या संपूर्ण प्रयोगास योग्यता प्रमाणपत्र नाकारणार नाही. मंडळ, तो प्रयोग या नियमाच्या उपबंधांचे उल्लंघन जरी करीत असला तरी, त्यास योग्य म्हणून प्रमाणित करील.

**१४०. <u>मनोरंजनाच्या प्रयोगासाठी लिखाणाची मान्य सूची तयार करणे</u>.**—मंडळ, १ एप्रिल, १९७४ नंतर, शक्य तितक्या लवकर, “मनोरंजनाच्या प्रयोगाच्या लिखाणाची मान्य सूची” म्हणून संबोधण्यात येणारी एक सूची तयार करुन त्यानंतर ती अद्यावत ठेवील. तिच्यामध्ये मंडळाने कोणताही फेरबद्दल न करता जिच्या बाबतीत योग्यतेचे प्रमाणपत्र दिलेले आहे अशा प्रत्येक लिखाणच्या नावाचा समावेश असेल. मंडळ अशा प्रत्येक सूचीची एक प्रत संबंधित अनुज्ञापक प्राधिका-यास पाठविल.

**१४१.** <u>फी</u>—नियम १३७, पोट – नियम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या लिखाणाच्या परिनिरीक्षणाच्या बाबतीतील फी पुढीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| (१) | नाटकाचे लिखाण | रुपये तीस |
| (२) | लोकनाटयाचे लिखाण | रुपये पंधरा |
| (३) | विविध करमणूक कार्यक्रमांचे लिखाण (गाणी, नृत्ये व असेच इतर प्रयोग धरुन) | रुपये दहा |
| (४) | एक अंक खेळाचे लिखाण | रुपये दहा |
| (५) | वग किंवा लावणी यांसारख्या तमाशाचे लिखाण | रुपये पाच |
| (६) | गणेश महोत्सव मेळयाचे लिखाण | रुपये तीन |

**१४२. <u>अध्यक्ष व सदस्य, इत्यादींना प्रवेश</u>** — मंडळाचे अध्यक्ष व सदस्य यांना जेथे कोणताही मनोरंजनाचा प्रयोग करण्यात यावयाचा असेल किंवा करण्यात येत असेल किंवा प्रदर्शित करण्यात यावायाचा किंवा प्रदर्शित करण्यात येत असेल अशा कोणत्याही जागी, सर्व वाजवी वेळी, मोफत प्रवेश देण्यात येईल व प्रयोगाच्या संघटकाकडून अशा प्रयोगाच्या जागेमधील सर्वोच्च वर्गातील दोन जागा त्यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील. लिखाण निरीक्षण मंडळाच्या अध्यक्षाकडून नियुक्त करण्यात येणा-या मानसेवी वाचकांनासुध्दा (परीक्षंकासाठीही) असा मोफत प्रवेश व अशा जागा देण्यात येतील.

**१४३. <u>योग्यता प्रमाणपत्र निलंबन किंवा ते रद्द करणे</u>**.—(१) कोणताही प्रयोग पाहिल्यानंतर मंडळाच्या अध्यक्षास किंवा कोणत्याही सदस्यास असे आढळून येईल की, प्रत्यक्ष केलेल्या किंवा प्रदर्शित केलेल्या संपूर्ण

प्रयोगाचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे परिनिरीक्षण करुन त्यास अभावित करण्यात आलेले नाही किंवा अशा प्रयोगाच्या बाबतीत योग्यता प्रमाणपत्र ज्या शर्तीस अधीन ठेवून देण्यात आले त्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग करण्यात आलेला आहे तर, त्यास, ही गोष्ट मंडळास कळविता येईल व त्याची एक प्रत अनुज्ञापक प्राधिका-याकडे पाठविता येईल.

(२) पोट-नियम (१) खालील प्रतिवृत्त मिळाल्यावर, मंडळास त्या प्रयोगासंबंधातील योग्यता प्रमाणपत्र, कोणतेही असल्यास, निलंबित किंवा रद्द करता येईल व मंडळ अशा निलंबनासंबंधी अनुज्ञापक प्राधिका-यास, शक्य तितक्या लवकर कळवील.

(३) कोणताही प्रयोग चालू असताना कोणत्याही वेळी असे आढळून येईल की, नियम १४० खाली मंडळाने तयार केलेल्या योग्य लिखाणाच्या मान्य सूचीत समाविष्ट असलेल्या लिखाणात कोणत्याही प्रकारे आक्षेपार्ह ठरेल अशा रीतीने, मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आलेला असेल तर, प्राधिका-यास, संबंधित पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, प्रयोग करण्यासंबंधातील अनुज्ञप्ती निलंबित किंवा रद्द करता येईल.

**१४४. <u>लिखाणाची फेरतपासणी इत्यादी</u>** — या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळास, स्वत: होऊन किंवा त्याबाबतीत त्यांच्याकडे अभिवेदन करण्यात आल्यानंतर, कोणत्याही वेळी त्याने नियम १३८ खाली ज्या कोणत्याही कार्यक्रमासंबंधात पूर्वीचे योग्यता प्रमाणपत्र दिले असेल त्या प्रयोगाच्या लिखाणाची फेरतपासणी करता येईल आणि नियम १३९ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणापैकी कोणत्याही कारणामुळे जाहीर मनोरंजनाच्या प्रयोगासाठी ते लिखाण अयोग्य आहे असे मंडळाचे मत होईल तर, मंडळास, त्यामुळे परिणाम होणा-या व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याने दिलेले योग्यता प्रमाणपत्र निलंबित किंवा रद्द करता येईल. मंडळ, अनुज्ञापक प्राधिका-यास आपला निर्णय कळवील.

**१४५. योग्यता प्रमाणपत्राची दुसरी प्रत**—नियम १३८ अन्वये कोणत्याही प्रयोगासंबंधात देण्यात आलेले कोणतेही योग्यता प्रमाणपत्र गहाळ किंवा नष्ट झाले असेल तर, मंडळास, संबंधित व्यक्तीने अर्ज केल्यानंतर आणि तीन रुपये फी दिल्यानंतर, "दुसरी प्रत" अशा लाल शाईतील स्पष्ट शिक्क्यासह दुसरी प्रत देता येईल.

**१४५-अ सूट.**—या नियमामधील कोणतीही गोष्ट पुढील बाबींस लागू होणार नाही.

**(अ)** (तमाशा व लावणी याखेरीज ) इ.सन १९०० पूर्वी ज्यांचे लिखाण प्रसिध्द झाले असेल असे मनोरंजनाचे प्रयोग, मात्र अशा रीतीने ते प्रसिध्द करण्यात आल्यानंतर त्या लिखाणामध्ये कोणतीही भर घातलेली नसली पाहिजे किंवा कोणताही फेरबदल केलेला नसला पाहिजे.

**(ब)** "मंडळाने त्यापूर्वी कोणत्याही वेळी, ज्या मेळयांच्या लिखाणाचे परिनिरीक्षण करुन ती संमत केली नसेल असे मेळे खेरीज करुन बृहन्मुंबईत अंमलात असलेल्या कोणत्याही अनुज्ञापन नियंमाखाली ज्या प्रयोगास अनुज्ञप्ती देण्यात आली असेल असा कोणताही मनोरंजनाचा प्रयोग, परंतु मंडळास कोणत्याही वेळी स्वत:हून किंवा याबाबतीत त्याच्याकडे अभिवेदन करण्यात आल्यानंतर अशा कोणत्याही प्रयोगाच्या लिखाणची तपासणी करता येईल आणि नियम १३९ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कारणांपैकी कोणत्याही कारणावरुन ते लिखाण प्रयोगासाठी योग्य नाही असे मंडळाचे मत होईल तर, मंडळास त्यामुळे परिणाम होणा-या व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशा प्रयोगास या नियमांच्या उपबंधापासून जी सूट देण्यात आली असेल, ती सूट मागे घेण्यात आली आहे असे घोषित करता येईल आणि त्यास आपला निर्णय अनुज्ञापक प्राधिका-यास कळविता येईल.

**(म. ग. मुगवे)**
**पोलीस आयुक्त,**
**बृहन्मुंबई.**

**दिनांक, २३ एप्रिल १९७४**

**<u>नमुना - " के "</u>**

( सार्वजनिक मनोरंजनाच्या जागा इत्यादीसंबंधात अनुज्ञप्ती देणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे याबाबतच्या नियमाचा नियम १३८ (२) पहा )

## तात्पुरत्या योग्यता प्रमाणपत्रांचा नमुना

तात्पुरत्या प्रमाणपत्राचा क्रमांक

दिंनाक

अर्जदाराचे नाव आणि त्याचा / तिचा पत्ता

अर्जदार ज्या व्यक्तीचे / संस्थेचे प्रतिनिधित्व

करीत असेल त्या व्यक्तीचे/ संस्थेचे नाव

अर्जाची तारीख

संहितेचे शीर्षक

लेखकाचे नाव

प्रमाणित करण्यात येते की, उपरोल्लिखित मनोरंजनाच्या प्रयोगाच्या लिखाणाचे अध्यक्ष आणि किंवा नियम १३८ (२) यांस अनुसरुन त्यांने निवडलेल्या सदस्याने/ सदस्यांनी किंवा वाचकांनी परिनिरीक्षण केले असून पुढील शर्तीसह त्या प्रयोगास मंजुरी देण्याच्या मंडळाच्या शक्तीस अधीन राहून. हे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. मंडळाचा अंतिम निर्णय होईपर्यन्त हे प्रमाणपत्र विधिग्राहय राहील.

शर्ती : -

**अध्यक्ष**
**रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ,**
**महाराष्ट्र शासन, मुंबई**

सुधारित नियम १४२ अन्वये, प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी, अध्यक्ष आणि सदस्य किंवा मंडळाच्या अध्यक्षाने नेमलेले मानसेवी वाचकांसाठी सर्वात वरच्या वर्गामध्ये दोन जागा राखून ठेवावयाच्या आहेत.

## नमुना - " आय "

( सार्वजनिक करमुणकीच्या जागांवर नियंत्रण ठेवण्याविषयीचा नियम १३७ (२) पहा )

करमणुकीच्या कार्यक्रमासाठी लिखाणाच्या योग्यतेच्या प्रमाणपत्रासाठी करावयाचा **अर्ज**

---

अर्जदाराचे संपूर्ण नाव
वय
पत्ता
ज्या व्यक्तीच्या अगर मंडळाच्या वतीने
अर्ज केला असेल त्या व्यक्तीचे अगर मंडळाचे
नाव

पत्ता

कार्यक्रमाचे स्वरुप (तमाशा, मेळा, नाटक
इत्यादी )
पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या लिखाणाचे शीर्षक

लेखकाचे नाव
प्रकाशकाचे नाव
पत्ता
प्रकाशनाचे साल
पूर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या पुस्तकांच्या
आवृत्तीचा क्रमांक
पुर्वपरीक्षणांसाठी दिलेल्या प्रतींची संख्या

तारीख

**अर्जदाराची सही**

---

१. अर्जदारास सही करता येत नसेल तर मामलेदार किंवा पोलीस पाटील यांच्या समक्ष अंगठा वळवून त्याबददल त्या अधिका-याची सही घ्यावी.

२. कोणताही करमणुकीचा कार्यक्रम करण्याची अथवा ठेवण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही इसमाने, असा कार्यक्रम ज्या तारखेस पहिल्या प्रथम करण्यात अथवा ठेवण्यात यावयाचा असेल त्या तारखेच्या निदान दोन महिने अगोदर मंडळाकडून त्या कार्यक्रमाच्या योग्यतेचा दाखला मिळविण्यासाठी अध्यक्षांकडे अर्ज केला पाहिजे

३. असा अर्ज नमुना " आय " मध्ये करण्यात आला पाहिजे. ज्या कोणत्याही अर्जात मंडळाचे समाधान होईल अशी सदरहू नमुन्यात निर्दिष्ट केलेल्या सर्व तपशिलासंबंधी माहिती नसेल तर त्याचा मंडळाकडून विचार केला जाणार नाही.

**नमुना " ज "**

( सार्वजनिक करमणुकीच्या जागांवर नियंत्रण ठेवण्याविषयीचा नियम १३८(१) पहा )

रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळाने घ्यावयाचे योग्यतेचे प्रमाणपत्र

प्रमाणपत्रांचा क्रमांक

दिल्याची तारीख

अर्जदारांचे नाव

ज्या व्यक्तीच्या अगर मंडळाच्या वतीने अर्ज केला
असेल त्या व्यक्तीचे अगर मंडळाचे नांव

अर्जदाराचा पत्ता

अर्जाची तारीख

परिक्षणासाठी सादर केलेल्या लिखाणाचे शीर्षक
व लेखकाचे नाव

प्रकाशकाचे नाव

प्रकाशन साल व आवृत्तीचा क्रमांक

दाखला देण्यात येतो की, उपरिनिर्दिष्ट करमणुकीच्या कार्यक्रमांचे लिखाण हे महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक करमणुकीचा कार्यक्रम म्हणून करण्यास किंवा दाखविण्यात योग्य आहे. मात्र असे की, पुढील अटी पाळण्यात आल्या पाहिजेत :-

अटी : -

**अध्यक्ष**
**रंगभूमी प्रयोगपरिनिरीक्षण, मंडळ**
**महाराष्ट्र शासन, मुंबई**

राज्य शासनाने केलेला नियम

रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाच्या अध्यक्षांस, सदस्यांस आणि चिटणीसास कोणताही करमणुकीचा कार्यक्रम ज्या जागी केला अथवा दाखविला जावयाचा असेल अथवा करण्यात अथवा दाखविण्यात येत असेल अशा कोणत्याही जागी विनामुल्य प्रवेश करु दिला पाहिजे व त्यांचेसाठी सदर कार्यक्रम आयोजित करणा-याने सर्वोच्च वर्गात दोन जागा राखून ठेवल्या पाहिजेत